नगरपरिषदा/महानगर पालिका (बृहन्मुंबई महानगरपालिका वगळून) यांच्यातर्फे चालविल्या जाणाऱ्या माध्यमिक, उच्च माध्यमिक व अध्यापक विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोगानुसार सुधारित वेतनश्रेण्या मंजूर करणेबाबत.

महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

शासन निर्णय क्रमांकः वेतन-१२१९/प्र.क्र.८३/टिएनटी-३

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई - ३२
दिनांक:-०३ जुलै, २०१९

वाचा :-

१. शासन निर्णय वित्त विभाग क्र.वेपुर-२०१८/प्र.क्र.४४/सेवा-९, दिनांक ०१ जानेवारी, २०१९
२. शासन अधिसूचना वित्त विभाग क्र.वेपुर २०१९/प्र.क्र.१/सेवा-९, दिनांक ३० जानेवारी, २०१९
३. शासन परिपत्रक वित्त विभाग क्र.वेपुर २०१९/ प्र.क्र.८/सेवा-९, दिनांक २० फेब्रुवारी, २०१९
४. शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र.वेतन-१२१४/(२७)/टिएनटी-३, दिनांक १६ जुन, २०१४
५. शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र.वेतन-१२१९/ प्र.क्र.१९/टिएनटी-३, दिनांक २२ फेब्रुवारी, २०१९
६. शासन परिपत्रक वित्त विभाग क्र.वेपुर-२०१९/प्र.क्र.१५/सेवा-९, दिनांक १४ मे, २०१९

प्रस्तावना :-

राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ च्या शिफारशी शासनाने काही फेरफारासह स्विकृत करण्याचा निर्णय संदर्भाधिन क्र.१ दिनांक ०१ जानेवारी, २०१९ च्या शासन निर्णयान्वये घेतला आहे. त्या अनुषंगाने राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना दिनांक १ जानेवारी, २०१६ पासून सुधारित वेतन संरचना लागू करण्याबाबत महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, २०१९ संदर्भाधिन क्र.२ दिनांक ३० जानेवारी, २०१९ अन्वये अधिसूचित केले आहे. तसेच या नियमानुसार प्रारंभिक वेतन निश्चितीबाबतची सविस्तर कार्यपध्दती संदर्भाधिन क्र.३ दिनांक २० फेब्रुवारी, २०१९ मधील परिपत्रकान्वये विहित करण्यात आलेली आहे. त्यानुसार राज्यातील अनुदानित अशासकीय शाळांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना शालेय शिक्षण विभागाने संदर्भ क्र.५ मध्ये नमूद केलेल्या शासन निर्णयानुसार सुधारित वेतनश्रेण्या वित्त विभागाच्या सहमतीने लागू केलेल्या आहेत. मात्र राज्यातील नगरपरिषदा व महानगरपालिकांच्या (बृहन्मुंबई महानगरपालिका वगळून) शाळांमधील कार्यरत माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक ३०८७

(मंजूर शिक्षक संख्या-३२२१) व कार्यरत शिक्षकेतर कर्मचारी ७२० (मंजूर शिक्षकेतर कर्मचारी संख्या-१०१४) यांना सुधारित वेतन संरचना दिनांक ०१ जानेवारी, २०१६ पासून लागू करण्यासाठी नगर विकास विभागाच्या सहमतीने निर्णय घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

शासन या आदेशाद्वारे राज्यातील नगरपरिषदा व महानगरपालिकांच्या (बृहन्मुंबई महानगरपालिका वगळून) शाळांमधील माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना संदर्भ क्र.५ येथील दिनांक २२ फेब्रुवारी, २०१९ च्या शासन निर्णयासोबतच्या अनुसुचीमध्ये नमूद केल्याप्रमाणे सुधारित वेतनश्रेण्या लागू करण्यास खालील अटींच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे. मात्र ही मान्यता खाली नमूद केलेल्या मर्यादेनुसारच व संदर्भ क्र.५ येथील दिनांक २२ फेब्रुवारी, २०१९ च्या शासन निर्णयाच्या सहपत्रामध्ये नमूद केलेल्या पदांच्या वेतनश्रेणीला अनुज्ञेय राहील.

२. सुधारित वेतन संरचने अंतर्गत वेतननिश्चिती करण्याबाबतचे नियम, संदर्भ क्र.२ शासन अधिसूचना वित्त विभाग क्रमांक वेपूर-२०१९/प्र.क्र.१/सेवा-९, दिनांक ३० जानेवारी, २०१९ व शासन परिपत्रक वित्त विभाग शासन परिपत्रक वित्त विभाग क्र.वेपुर २०१९/प्र.क्र.८/सेवा-९, दिनांक २० फेब्रुवारी, २०१९ प्रमाणे राहतील.

३. सुधारित वेतन संरचनेत निश्चिती करण्यासाठी आवश्यक तो विकल्प हे आदेश निर्गमित झाल्याच्या १ महिन्यांच्या आत देण्यात यावा. एकदा दिलेला विकल्प अंतिम राहील.

४. या प्रमाणे सुधारित वेतनसंरचना लागू केल्यामुळे होणारा अतिरिक्त खर्च माध्यमिक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्ते यावरील सध्या ज्याप्रकारे व ज्या लेखाशिर्षाखाली खर्ची घालण्यात येतो त्याच पध्दतीने त्याच लेखाशिर्षाखाली खर्ची घालण्यात यावा व त्या खालील मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

५. महानगरपालिका / नगरपालिका यांची वेतनश्रेणी या विभागाच्या वेतनश्रेणींपेक्षा वेगळी असल्यास त्याचा अतिरिक्त वित्तीय भार संबंधित महानगरपालिका / नगरपालिका यांचेवर राहील व ती जबाबदारी शालेय शिक्षण व क्रीडा विभागाची राहणार नाही.

४. सदरचा शासन निर्णय नगर विकास विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.२६/२०१९/नवि-१४, दिनांक १० जुन, २०१९ अन्वये दिलेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०७०३१५४०३२४४२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Charushila Devendra Chaudhari

Digitally signed by Charushila Devendra Chaudhari
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=School Education and Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=b99d7dca0e63be1bd1b7158b9523537dcc1d46bc807768647a9ed4ff3816ecf3, cn=Charushila Devendra Chaudhari
Date: 2019.07.03 15:48:30 +05'30'

(चारुशीला चौधरी)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.अध्यक्ष / उपाध्यक्ष, विधानसभा यांचे खाजगी सचिव
२. मा.सभापती / उपसभापती, विधानपरिषद यांचे खाजगी सचिव
३. मा.मंत्री (शालेय शिक्षण व क्रीडा विभाग) यांचे वि.का.अ., मंत्रालय, मुंबई
४. मा.विधानसभा / विधानपरिषद विरोधी पक्ष नेता
५. सर्व मा.विधानसभा व विधानपरिषद सदस्य
६. मा.अपर मुख्य सचिव (शालेय शिक्षण व क्रीडा विभाग) यांचे स्वीय सहायक,मंत्रालय,मुंबई
७. महालेखापाल-१ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई
८. महालेखापाल-१ (लेखा व अनज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई
९. महालेखापाल-२ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई
१०.महालेखापाल-२ (लेखा व अनज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई
११.आयुक्त, शिक्षण महाराष्ट्र राज्य, पुणे १
१२.शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे
१२. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक
१४. सर्व शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
१५. सर्व शिक्षणाधिकारी (माध्यमिक), महानगरपालिका / नगरपालिका
१६. सर्व शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई
१७. निवड नस्ती, टिएनटी-३.